English Marathi Hindi E-paper Manoranjan Astro Book Classified Ad Maha Marathon

शुक्रवार २४ जुलै २०२० आजचा ई-पेपर
पुणे

लोकमत
हिंदी | English

Download App :
Follow us :

ताज्या महाराष्ट्र पुणे शहरं मनोरंजन व्हिडीओ फोटोफ्लिक क्रीडा लाइफ स्टाइल ऑटो आणखी...

लाइव न्यूज 11:42 AM चंद्रपूर : चंद्रपुरात आदिलाबाद येथील 75 वर्षीय कोरोना बाधित महिलेचा मृत्यू झाला. ही महिला तेलंगणा राज्यातील आदिलाबा...

होम > नांदेड > Lockdown victim: after 600 km walking for survive they s...

# लॉकडाऊनचा बळी : जगण्यासाठी ६०० किमीची पायपीट अन् समोर वडिलांचा मृत्यू

मुलीच्या लग्नाचे कर्ज फेडण्याची चिंता राजू बाभूळकर यांना सतावत होती त्यांची चिंता कमी व्हावी, यासाठीच पत्नी मुलासह रोजगाराच्या शोधात मुंबईला गेली होती

By लोकमत न्यूज नेटवर्क | Follow | Published: May 15, 2020 06:35 PM | Updated: May 15, 2020 06:43 PM



लॉकडाऊनचा बळी : जगण्यासाठी ६०० किमीची पायपीट अन् समोर वडिलांचा मृत्यू

## ठळक मुद्दे

- विस्थापित मजुरांचे जीवघेणे प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत
- उदरनिर्वाह चालवायचा कसा या विवंचनेतून घेतला गळफास

हदगाव (जि नांदेड ) : लॉकडाऊन जाहीर झाल्यापासून हाताला काम नाही त्यामुळे खायचे काय? या चिंतेत असतानाच मुंबईला रोजीरोटीसाठी गेलेले कुटुंब १५ दिवसांचा तब्बल ६०० किमी पायी प्रवास करून गावी हदगावात पोहोचले घरात असलेल्या मुलीसह स्वत:च्या रोजीरोटीचा प्रश्न बिकट असताना आता मुंबईहून आलेल्या आई, पत्नीसह दोन मुलांना सांभाळायचे कसे? या विवंचनेतून राजू मारोती बाभूळकर या ४० वर्षीय इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केली या प्रकारामुळे विस्थापित मजुरांचे जीवघेणे प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत

राजू बाभूळकर दोन मुले, दोन मुली, पत्नी आणि आईसह हदगाव येथील वडार गल्लीतील आझाद चौकात राहत होते हदगावनजीकच असलेल्या हडसणी येथील एका स्टोन क्रेशरवर दगडफोड करून कसाबसा कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित होते मात्र, मागच्या वर्षी मोठ्या मुलीचे लग्न झाले या लग्नासाठी मायक्रोफायनान्सचे कर्ज त्यांनी घेतले होते हे कर्ज कसे फेडायचे, असा प्रश्न त्यांना सतावित होता त्यातूनच पत्नी, दोन मुलासह

## Trending & Latest News

उदयनराजे भोसले | व्यंकय्या नायडू | छत्रपती शिवाजी ... | कोरोना वायरस ... | राम मंदिर | नरेंद्र मोदी | राहुल गांधी | महाराष्ट्रात कोरो... | सुशांत सिंग रजपूत

## POLL

राम मंदिर भूमिपूजनाऐवजी कोरोना संकटाकडे, खचलेल्या अर्थव्यवस्थेकडे लक्ष द्यावं, असा सल्ला शरद पवारांनी भाजपाला, केंद्र सरकारला दिला आहे. त्याबद्दल काय वाटतं?

○ शरद पवारांचं मत योग्य आहे!
○ कोरोनामुळे मंदिराचं काम थांबवण्याचं कारण नाही!

VOTE View Results

## राशी भविष्य

मेष वृषभ मिथुन कर्क सिंह कन्या
तुला वृश्चिक धनु मकर कुंभ मीन

## व्हीडीओ




पुण्याचे महापौर मुरलीधर मोहोळ यांचा कोरोनाविरुद्धचा लढा

आईला घेऊन राजू यांच्या मोठ्या भावाकडे मुंबईला (कल्याण) रोजगारासाठी गेली. मयत राजू यांचा मोठा भाऊ शैलेष हा १९९५ पासून कल्याण येथे राहून आपला उदरनिर्वाह चालवित असल्याने कुटुंबातील हे सदस्यही मार्च महिन्यात कल्याणला गेले. सुदैवाने कल्याणमधील पत्रेफूल येथील केडीएमसीच्या एका कंपनीत त्यांना रोजंदारीवर काम मिळाले. पुरुषाला ३०० रुपये तर महिलांना २०० रुपये प्रतिदिन हजेरी असल्याने तेथेच टिकून काम करायचा निश्चय या सर्वांनी केला.

**कल्याणहून पायी आले गावाकडे**

इकडे हदगावमध्ये राजू बाभूळकर आपल्या १८ वर्षीय मनीषा या मुलीसह गावीच राहत होते. सारे काही सुरळीत होईल अशा अपेक्षा असतानाच अचानक कोरोनाचे संकट उभे राहिले. लॉकडाऊन वाढत जाऊ लागला, तसे कल्याण येथे काम करणाऱ्या या कुटुंबीयांनी हातातले पैसे संपत आल्याने गावाकडे परतण्याच्या हालचाली सुरू केल्या. अखेर १४ एप्रिलनंतरही लॉकडाऊन सुरूच राहिल्याने पत्नी, आई सुमन आणि मोठा मुलगा सचिन (वय २०) आणि लहान मुलगा दशरथ (वय १७) यांच्यासह २९ एप्रिल रोजी कल्याणहून गावाकडे निघाले. लॉकडाऊनमुळे वाहतूक व्यवस्था ठप्प असल्याने गावाकडे पायीच परतण्याचा निर्धार या सर्वांनी केला. त्यांच्यासोबत हदगावचे काही नातेवाईकही होते. या प्रवासात काही गावांत त्यांच्या खाण्याची सोय झाली, तर कधी उपाशीपोटीच प्रवास करावा लागला. अखेर १५ दिवसांत ६०० किमीचा पायी प्रवास करून १३ मे रोजी हे सर्व हदगाव येथे पोहोचले. गावामध्ये येताच प्रशासनाने सर्वांना क्वारंटाईन केले. पत्नीसह आई आणि मुले हदगावमध्ये आल्याचे राजू बाभूळकर यांना समजले. लॉकडाऊनमुळे सलग ५० दिवस हाताला काम नसल्याने राजू यांची आबाळ होत होती. त्यातच आता कल्याणहून आलेल्या या सर्वांना कसे पोसायचे? याची चिंता कुटुंबप्रमुख असलेल्या राजू यांना सतावू लागली. वडिलांसोबत राहणारी मुलगी मनीषा घराजवळच असलेल्या मामाकडे झोपत असे. त्यामुळे राजू घरी एकटेच होते. यातूनच १४ मे रोजी सायंकाळी राजू यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली.

**कुटुंबप्रमुखाच्या आत्महत्येमुळे सगळेच हादरले**

मुलीच्या लग्नाचे कर्ज फेडण्याची चिंता राजू बाभूळकर यांना सतावत होती. त्यांची चिंता कमी व्हावी, यासाठीच पत्नी मुलासह रोजगाराच्या शोधात मुंबईला गेली होती. मात्र, लॉकडाऊनमुळे तेथे मिळालेला रोजगारही हिरावला गेल्याने या कुटुंबीयांनी पुन्हा मूळगावी हदगावला परतण्याचा निर्णय घेतला होता. सुमारे १५ दिवस ६०० किमीचा पायी प्रवास करून अनेक अडीअडचणीवर मात करीत हे सर्वजण हदगावमध्ये पोहोचले होते. गावी गेल्यानंतर वडिलांना भेटू आणि पुन्हा गावात राहून रोजीरोटीसाठी प्रयत्न करू अशी या सर्वांची अपेक्षा होती. मात्र कुटुंब प्रमुख असलेल्या राजू यांनीच आत्महत्या केली. या घटनेमुळे मुंबईहून परतलेले सर्व कुटुंबीयही हादरले आहेत.

**Web Title:** Lockdown victim: after 600 km walking for survive they saw father's death, incident in Nanded

Get Latest **Marathi News** , **Maharashtra News** and **Live Marathi News Headlines** from Politics, Sports, Entertainment, Business and hyperlocal news from all cities of Maharashtra.

शेअर करा

टॅग्स: corona virus | Suicide | Nanded | कोरोना वायरस बातम्या | आत्महत्या | नांदेड

**You May Like**

Sponsored Links by Taboola

**Now Your Child Can Build Alexa-like Intelligent Chatbots!**
CampK12

**People Caught Doing Unusual Things on Public Transportation**
Sizzlfy

**Anubhav Sinha on not naming the Bollywood Privilege Club in his tweet: It's okay to stay quiet**
India Today

**Create & Send Invoices Online**
Imprezz

**Woman's Vacation Photo Goes Viral, She Only Realizes Why After Taking A Second Look**
Bedtimez

**30 Wedding Photos That Went Horribly Wrong**
Gloriousa


## संबंधित बातम्या

CoronaVirus Lockdown : संभ्रमावस्थेत परप्रांतीय, जीवाच्या भीतीने परतायचे की पोटाच्या आगीसाठी थांबायचे
4 minutes ago

Coronavirus : धक्कादायक! कोरोनाच्या भीतीने वृद्धाची गळफास घेऊन आत्महत्या
13 minutes ago

1 day ago

## फोटो



...तर 'ते' धोकादायक ठरु शकतात; पृथ्वीच्या दिशेने आज येणार ३ संकटं, वैज्ञानिकांचं बारकाईनं लक्ष
33 minutes ago

कोविड १९ : रुग्णांच्या संपर्कातील नजिकच्यांचा शोध घ्या
13 minutes ago

coronavirus : कोरोना बाधितांच्या संपर्कातील दहा जण आयसोलेशन कक्षात
15 minutes ago

CoronaVirus Lockdown : नियमित प्रवाशी ट्रेन सुरू होणार ?, वैद्यकीय तपासणी यंत्रणा उभारण्याबाबत रेल्वेला सूचना
15 minutes ago

coronavirus : शेवडी गाव सील; जिंतूर शहर परिसरात संचारबंदी
18 minutes ago

## नांदेड अधिक बातम्या

संतापजनक ! माहूरमध्ये राजघराण्यातील मृतांच्या समाधीची मोडतोड
18 hours ago

नांदेड जिल्ह्यात दमदार पाऊस; शिवणी मंडळात अतिवृष्टी
23 hours ago

मारलेल्या अजगराची छायाचित्रे व्हॉटस्‌ॲपवर टाकणे पडले महागात
1 day ago

नांदेड जिल्हयातील दमदार पाऊस; कुरुळा मंडळात अतिवृष्टी
3 days ago

नांदेडमध्ये पालकमंत्री चव्हाण यांचे निकटवर्तीय आमदार कोरोनाबाधित; अनेक अधिकारी विलगीकरणात
3 days ago

coronavirus : नांदेडमध्ये कोरोनाचा उद्रेक; शनिवारी ९४ बाधित रुग्ण आढळले
5 days ago

लोकमत
Powered by CLICKSTART

About Us
Advertise with Us
Privacy Policy
Contact Us
Feedback
Sitemap
Terms of Use

OUR NETWORK
lokmatnews.in
english.lokmat.com
epaper.lokmat.com
deepotsav.lokmat.com
lokmat.net

FOLLOW US

DOWNLOAD APP
Lokmat
Kaaldarshika

## शहरं

मुंबई
पुणे
औरंगाबाद
नाशिक
नागपूर
सोलापूर
कोल्हापूर
सातारा
सांगली
अहमदनगर
अकोला
जळगाव
गोवा

## सेक्शन

मनोरंजन
व्हिडीओ
फोटोफ्लिक
क्रीडा
लाइफ स्टाइल
ऑटो
तंत्रज्ञान
महाराष्ट्र विधानसभा निवडणूक
ब्लॉग्स
अध्यात्मिक
बातम्या
संपादकीय
राशी भविष्य

## ताज्या बातम्या

मोदी सरकारचा चीनला आणखी एक दणका; Helo Lite सहीत 'या' ॲप्सवर घातली बंदी

माजी आमदार मधुकर कांबळे यांचे निधन

वर्ग सुरू होण्यासाठी 'वेट ॲन्ड वॉच'; शिक्षण विभाग अलर्ट !

सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी हजारोंमध्ये; गुन्हे मात्र केवळ दीड हजार दाखल

युद्ध जिंकणार! आता देशात तयार होणार कोरोनाचं सगळ्यात स्वस्त आणि प्रभावी औषध

Copyright © 2013-2019 Lokmat Media Pvt Ltd